प्रेसनोट

कुख्यात गँगस्टर रवी सुल्या पुजारी यास खंडणी विरोधी पथक गुन्हे शाखा ठाणे काडुन अटक केले बाबत

कासारवडवली पोलीस स्टेशन,ठाणे गु.रजि.नं. I **१९६/२०१७** भा.दं.वि. कलम ३८५,३८७, १२०(ब), ३४ सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४)प्रमाणे दाखल असुन सदरचा गुन्हा मोक्का स्पेशल कोर्ट केस क्र.११/२०१८ प्रमाणे न्यायप्रविष्ठ आहे.

सदर गुन्हयात गँगस्टर रवीप्रकाश सुलय्या पुजारी हा पाहीजे आरोपी होता. सदर आरोपी रवी पुजारी याने २०१७ च्या कालावधीत बांधकाम व्यवसायीकाकडे १० करोड रूपयाची खंडणीची मागणी करून खंडणी न दिल्यास जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती व त्यानंतर सदर व्यवसायीकाचे कार्यालयावर फायरींग करण्याकरीता त्याचे हस्तक पाठवीले होते. रवी पुजारी यापुर्वीच्या कालावधीत परदेशात राहुन गुन्हे करीत होता. त्याचे विरूध्द आतापावेतो विवीध ठिकाणी सुमारे ४४ गंभीर स्वरूपाच्या गुन्हयांची नोंद असुन त्यास पकडण्याच्या अनुषंगाने त्याची 'रेड कॉर्नर'' नोटीस काढण्यात आली होती. सन २०१९ मध्ये रवी प्रकाश सुल्या पुजारी उर्फ रवी पुजारी, वय ५७ वर्षे, रा.ठि. ओम नम: शिवाय हाऊस, ब्रिज जवळ, मलमे, उडपी, मँगलोर, कर्नाटक यास रिपब्लीक ऑफ सेनेगल या देशात पकडण्यात आले होते. त्यानंतर त्याचा खंडणी विरोधी पथक गुन्हे शाखा ठाणे कडुन प्रत्यार्पण करार प्रस्ताव पाठवीण्यात आला होता. सदर प्रस्तावास सेनेगल देशाकडुन मंजुरी मिळाल्यानंतर रवी सुल्या पुजारी यास सपोनि / कापडणीस खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा ठाणे आणि पोलीस अंमलदार यांचे मार्फतीने जिल्हा मध्यवर्ती कारागृह, पॅरॉपन्ना, बेंगलोर, कर्नाटक मधुन दि. **१७/०३/२०२६ रोजी** ताब्यात घेवुन प्रस्तुत गुन्हयात अटक केली आहे. त्यास मा.न्यायाधीश विषेष मोक्का न्यायालय ठाणे यांचे समक्ष हजर केले असता त्याची दि.२७/०३/२०२६ पावेतो पोलीस कोठडी रिमांड मिळाली आहे. पुढील तपास मा.सहायक पोलीस आयुक्त, श्री.विनय घोरपडे, गुन्हे शाखा, ठाणे हे करीत आहेत.

****